# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XVIII. AKOLA MONDAY 28th JANUARY. 1884 NO 4

वर्ष १८ अकोला सोमवार तारीख २८ माहे जानेवारी सन १८८४ इ० अंक ४


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाची आगाऊ | ५ |
| सहामाही ,, | ३ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| **डांक हांशील.** | |
| वर्षाचे आगाऊ | ०१३ |
| सहामाही | ०८ |
| साल अखेर | १०८ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरूं केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०३ |


*WONDERFUL SARSAPARILLA!*

This preparation containing all the medical properties of the valuable drug Sarsa, combined with some other useful ingredients, is *guaranteed* to cure obstinate skin diseases, syphilitic eruptions, constitutional syphilis, loss of appetite Nervous and General Debility costiveness, venerial sores, and all other affections arising from the abuse of mercury.

*per bottle Rs 1 Packing As 4 Per doz Rs 11.*

Specifics for Spermatorrhœa Gonnorrhœa, Gleet, Syphilis, and impotence. In bottles Rs. 2 and Rs. 4 Packing Ans. 4 *Cure guaranteed* In failure the money will be returned.

CURE FOR HYDROCELE.

*Guaranteed* to cure cases of, long standing. Warranted to be free from mercury or other injurious drugs. In pots Rs. 2 and Rs. 4 Packing Ans. 4 Per doz. Rs. 21 and Rs. 40.

W. Rooder and Co.
Surgeons Calcutta,


## नोटीस

मोहनलाल रघुनाथराय कायत हल्लीं व- ... हैद्राबाद यांस खालीं सही करणार ... सि देतों कीं, तुह्मी आमचीं शेते आम- सारखा ... त्यानें मिळूं देऊन तसेच तंटा तोडल्याशिवाय हरकत नसल्याचें लिहून गेलात. परंतु शेताबद्दल

किंवा तुमचे हयगयीबद्दल मी अगदीं जबाबदार नहीं. तुह्मास पूर्वी नोटिस दिली त्या पासून अलिकडे जानजी व विठोबा यांनीं माझे जास्त नुकसान केले आहे त्याबद्दल तुह्मी जबाबदार आहात.

(सही) शेख इब्राहिम वल्लद अमीर चुनेवाला अकोला.

## जाहिरात.

नादारी मुकद्दमा नंबर २
सन १८८४.

नमुना ( जी )

विद्यमान नादारी कोर्टाचे जड्ज्य जिल्हे अकोले.

तमाम सर्व लोकांस नोटिस देण्यांत येते कीं, महमदअल्ली हाबिबुल्ला बोहरी राहणार अकोले तालुके अकोले हा नादारी आहे असा आज तारीख १९ माहे जानेवारी सन १८८४ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि ता० १९ माहे मार्च सन १८८४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकरतां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाईनी नेमून देण्याकरतां व नादारानें आपले सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरतां नेमला आहे. नादाराच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या ष्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटिस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याजबद्दल ज्या साक्षी समक्ष करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांची नांवें नमुद करावीं ही नोटिस जबाबाकरतां नेमले त्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पराण्या करतां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याच्या ष्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दुरचे रहाणारे असतील त्यानीं आठ आण्याचे ष्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरा पुढें तीच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिस्टरी दाखल होतील तारीख ७ माहे जानेवारी सन १८८४ इसवी.

( Signed) H. Nicholetts.
नादारी कोर्टाचे जज्ज.
जिल्हे अकोले.

### नोटीस

रा. रा. भवानसा तुकुसारंगारी राहणार बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचा आमचा पैशाटक्याचा वगैरे देवघेवीबद्दल सर्व हिशेब होऊन तुमचे आह्मी आठशे ८०० रुपये देणें ठरले व हें देणें आह्मी दरसाल रुपये पन्नासप्रमाणें देऊन सोळा वर्षांत सदरहू रुपये ८०० फेडावे. ह्मणून हप्तेबंदी खत करून दिले व ठरावाप्रमाणें आह्मी तुह्मांस चार सालच्याचे रुपये २०० दिले त्याजबद्दल तुह्मी आजपावेतों आह्मांस दोनशे रुपयाची पावती दिली नाहीं या गोष्टीस आजसुमारें पांच वर्षें झाली दरम्यान आह्मी आपले राहते घर गहान ठेऊन तुह्मांपासून रुपये ४०० कर्ज काढिलें व याजबद्दल आह्मी व्याज रुपये ७२ तुह्मास दिले त्यास आज सुमारे एक वर्ष होत आले परंतु आह्मी रुपये ७२ ची पावती तुह्मी दिली नाहीं याखेरीज आह्मी तुह्मापासून कापड विक्रीकरितां घेऊन जावे आणि विक्री करून रुपये व कापड व त्या संबंधी सर्व कागद, कीर्द, खतावणी उधारपट वगैरे तुमचेपाशीं ठेवावे असें करित असतां गेल्या दिपवाळीच्या वेळीं जे आह्मी बाहेरून वगैरे बजारहाटकरून विक्रीचे रुपये व कापड, कागदपत्र कीर्दवही वगैरे तुमचे येथें आणून ठेविले ते तुह्मी आजपावेतों देत नाहीं येणें प्रमाणें सदरहू तीन गोष्टीच्या व्यवहारांबद्दल कागद कीर्द. खतावणी तुमचेपाशीं आहेच त्यावरून सर्व हिशेब करून जो व्यवहार आजपावेतों तुमचा आमचा झाला त्याचा हिशेबकरून तुमचे देणें आह्मी निघल्यास आह्मी देतो व आमचे तुह्मी निघाल्यास तुह्मी द्यावेत सदरील सर्व हिशेब वगैरे करून सर्व उलघडा ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत सर्व निकाल करावा तसे न केल्यास रीती प्रमाणें सरकारांत काम चालवून सर्व नुकसान भरून घेतलें जाईल कळावें.

(सही) नतुसा बुटीसा रंगारी राहणार बाळापूर दस्तुर खुद.

## जाहिरात.

जाहिरात नमुना नंबर १४३ किरकोळ मुकदमा नंबर २ सन १८८४ क्लास नंबर १९ कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटी फिकीट मिळावें ह्मणून त्याणें जिल्हे कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८६० चा आक्ट २७ कलम ३ प्रमाणें.

डिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे आकोले यांचे कोर्टांत श्रावण वल्लद लक्ष्मण शेळके मौजे गोवर्धं तालुके आकोट जिल्हे आकोले यास मयत दमुना ... शेळके राहणार मंचनपूर तालुके आकोट ईचे कर्ज वसूल करता येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार याणें अर्ज केला आहे याजकरितां सदरहू मैत मनुष्याचे माल मिळकतिवर किंवा त्याचें कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, याणी तारीख २४ माहे फेब्रुवारीं सन १८८४ इसवी रोजी सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख १९ माहे जानेवारीं सन १८८४

लक्ष्मण माधव असिष्टंट सिरस्तेदार.

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ३० शके १८०५

## युनिव्हर्सिटीची वार्षिक सभा.

या सभेचा समारंभ सालाबादप्रमाणें ता० १९ रोजीं झाला त्याप्रसंगी नामदार गव्हरनर साहेबांनीं च्यान्सलरच्या नात्यानें फार सुरस व व्यवहार प्रयोजक असें भाषण केलें त्यांतून एकदोन गोष्टी निःसंशय देशोन्नतीस व विद्या वृद्धीस फार उत्तेजन कारक आहेत मागील सालामध्यें युनिव्हर्सिटीनें असा ठराव केला कीं, ... ज्या निरनिराळ्या वरिष्ठ प्रतीच्या ... देत यास येण्याची स्त्रियांत हद्दीचे नंबर ... आहे ह्या ठरावासंबंधानें ... ह्मणाले कीं विद्येच्या संबंधानें पुरुषास ... सोयी आहेत तशाच स्त्रियांस कां असूं ... याचें कांहींच कारण आह्मास दि... तथापि ह्या देशाची सांप्रतची जी ... ति आहे तींत पुष्कळ फेरफार झाल्या ... अशाप्रकारच्या स्त्री शिक्षणाच्या बाब... कांहीं एखादी तजवीज करता येण्याची ... लकुल अशा नाहीं.

सध्या लहान मुलींकरितां स्वतंत्र मुलींच्या शाळांतून अगर कांहीं ठिकाणीं मुलांच्या शाळांतून मात्र शिक्षणाच्या सोयी आहेत त्या वयांत आल्या ह्मणजे त्यांस वरिष्ठ प्रतीचे शिक्षण देण्यास शिक्षक स्त्रियाच असल्या पाहिजेत. अशाप्रकारचे शिक्षक तयार होईतों तो स्त्रियांच्या अधिक शिक्षणाचीही आशा नाहीं व खासगी शिक्षणानें अशा परि

येण्याची नोंदपर्यंत युनिव्हर्सिटीची परवानगी मिळणार नाहीं तोंपावेतों असे शिक्षक निपजण्याचीही आशा नाहीं.

युनिव्हर्सिटीचे नियम प्रथमपासून फार कडक आहेत. त्या नियमाप्रमाणें युनिव्हर्सिटीच्या कोणत्याही पदवीच्या परिक्षेस येण्यास तिला जोडलेल्या कालेजा मध्यें पूर्वी नियमित काल पावेतों अध्ययन करावें लागतें यावरून ह्या पाठशाळांतून जर मुलींची किंवा स्त्रियांची शिकण्याची सोय झाली तर मद्रास युनिव्हर्सिटीच्या देणगीचा स्त्रियांस भाग घेतां येणार. पण ह्या पाठशाळा तर युनिव्हर्सिटीच्या ताब्यांत नाहींत. कांहीं सरकारी पाठशाळा आहेत त्या विद्याखात्याच्या अधिकाऱ्याच्या स्वाधीन आहेत व ज्या कांहीं खासगी आहेत त्या कियेक कमिट्यांच्या ताब्यांत आहेत. मग युनिव्हर्सिटीचा हा ठराव कसा प्रचारांत आणितां येईल या बा संशयच आहे. आह्मांस कळतें कीं हा ठराव' वैद्य स्त्रियांच्या कमिटी'च्या सूचनेवरून झाला आहे व ह्या कमिटीस त्यापासून उपयोगही होईल. वास्तविक पाहिलें असतां हिंदुस्थानच्या लोकस्थितीच्या मानानें अशा प्रकारच्या स्त्रीशिक्षणाचा काळ प्राप्त होण्यास फार अवधि पाहिजे. परंतु ज्या स्त्रियांस शिकण्याचा उत्साह असेल व ज्यांस खाजगी रीतीनें शिकण्याच्या सोयी आहेत त्यांस या बाबतींत उत्तेजन देण्याचें युनिव्हर्सिटीचे स्वाधीन आहे. ह्या ठरावाचे पुष्टीकारणास तिच्या हातून होण्या जोगें तिनें तूर्त एवढेंच केलें पाहिजे कीं सदरहू परीक्षांस येण्यास पात्र होण्यास कालेजामध्यें अगाऊ नियमित काळपावेतों अध्ययनाकरितां विद्यार्थ्यांस राहावें लागतें तें स्त्रियांस लागू नसावें. असा नियम करण्यास ह्मणने ... आहे असें नाहीं. कलकत्तास युनिव्हर्सिटीचा असा प्रतिबंध नाहीं.

दुसरी ह्या युनिव्हर्सिटीस आमची अशी सूचना आहे कीं कलकत्ता युनिव्हर्सिटी या नियमान्वयें तिकडील शिक्षकांस व शाळाखात्यांतील दुसऱ्या कित्येक नौकरांत कालेजांत अगाऊ काहीं मुदतपावेतों न शिकतां परिक्षेस येण्याची जशी परवानगी आहे तशी ह्या ...मील शिक्षकांस ही ह्या युनिव्हर्सिटी ...अभ्यासंत्र यानें त्यांचे अभ्यास ...तात व अशा प्रकारचें उत्तेजन ...नें त्यांस अभ्यासकरून आप ...ज्ञान वाढविण्यास फार उत्तेजन ...ईल.

दुसरें नामदार साहेबांनीं आपल्या भाषणांत असें सुचविलें कीं विद्यासंपन्नतेबद्दल सन्मानाचे किताब देण्याची जशी चाल आहे तशीच सरकारची उत्तम कामगिरी केल्याबद्दल ही 'फेलोशीप' ची पदवी दिली असतां गैरवाजवी होणार नाहीं. शेवटीं मागील सालीं इल्बर्ट बिलासंबंधी वादविवाद चालला असतांना नेटिव व युरोपियन या उभयतांची एकमेकांविषयीं जी स्पर्धा चालली होती ती विसरून दोन्ही ही पक्षांचे लोक याप्रसंगीं एकत्र जमून सार्वजनिक हिताकरितां एकमतानें झटत आहेत असें पाहून नामदार साहेबांनीं आपला संतोष प्रदर्शित केला.

---

## वऱ्हाड शाळाखात्याचे डायरेक्टर.

आह्मांस कळविण्यास संतोष वाटतो कीं राव बहादूर नारायण भाई दांडेकर आठ महिन्याच्या फर्लोवर आहेत तों पावेतों अथवा पुढील हुकुमापावेतों वऱ्हाड शाळा खात्याच्या डायरेक्टरचे जागीं रा० रा० श्रीराम भिकाजी जठार बी. ए. यांस आफिशिएटिंग नेमिलें. ही आठ महिन्याची रजा भोगल्यावर भाई साहेब इकडे परत न येतां परभारें पेनशनाचा अर्ज दाखल करणार आहेत करितां मि० जठार यांचीच या जागीं कायमची नेमणूक होईल अशी आतां खात्री वाटते. भाई साहेबांस त्यांनीं मागितलेल्या तारखे पासून रजेवर जाण्यास जेव्हां मे० रेसिडेंट साहेबांनीं परवानगी दिली तेव्हां मि० जठार यांस त्यांनीं इन्च्यार्ज मात्र नेमिलें होतें. तेव्हां हिंदुस्थान सरकाराकडून या जागीं कोणाची नेमणूक होईल याबद्दल बरीच शंका वाटत होती कारण वऱ्हाडांतील व मुंबई इलाख्यांतील बऱ्याच गृहस्थांच्या खटपटी या जागे करितां चालल्या होत्या. परंतु हिंदुस्थान सरकारांनीं त्या सर्व प्रकरणाचा विचार करून मे. रेसिडेंट साहेबांच्या शिफारसीप्रमाणें योग्य हक्कदाराची त्या जागीं नेमणूक केली हें मि० कारडरी साहेबांच्या कारकिर्दीस भूषणास्पद आहे.

आह्मांस पूर्वीपासून वाटत होतें कीं, ही जागा युरोपियनास न मिळतां नेटिवासच मिळेल. कारण या जागेवर नेटिवांची नेमणूक करण्याचा माजी गव्हरनर जनरल साहेब लार्ड नार्थब्रुक यांनीं जो सुकाणी ठराव केला तो नेटिवांच्या हक्काचे परम वनवाळु लार्ड रिपन साहेब सोडून देतील असें बिलकूल वाटत नव्हतें. तरी 'हात व होंड यांत फार अंतर असतें ' या ह्मणी प्रमाणें येथें आज पावेतों ज्या निरनिराळ्या आफवा उडत होत्या त्यावरून कोणत्या कारणास्तव ही गोष्ट जाईल याचाही भरवंसा वाटत नव्हता. दुसरें हिंदुस्थान सरकार ही जागा नेटिवासच देतील हें जसें आह्मांस वाटत होतें तसें ती देण्याकरितां वऱ्हाडांतच लायक नेटिव गृहस्थ असतां तें बाहेर धुंडाळण्याच्या नादांत पडतील असें ही वाटत नव्हतें. एकंदरींत हिंदुस्थान सरकारानें ही नेमणूक फार स्तुत्य केली. आतां भाई साहेबांचा परत न येण्याचा उद्देश ज्या अर्थी हिंदुस्थान सरकारास कळलाच आहे त्या अर्थी त्यांनीं ही नेमणूक अशीच केलीशी दिसतें कीं हे फर्लोचे आठ महिने संपतांच ते मि० जठार यांसच या जागीं कायम करितील व असेंच होण्याची आह्मी उमेद बाळगतों.

आतां ए० इ० ची जागा रिकामी झाली आहे तरी त्या जागीं ही कोणाची नेमणूक होते तें पहावें. तथापि ह्या खात्यांतील किंवा बाहेरच्या एखाद्या युरोपियनाची भरती होण्याची तर भीति दिसत नाहीं परंतु अकोला हायस्कुलाची स्थिति सुधारण्याकरितां ह्मणून भलतीच एखादी तजवीज ह्या खात्यास त्रास होऊन शाळा खात्याचा चांगला फायदा होईल असें आह्मांस वाटत नाहीं. या करितां ही जागा भरतांना हीं हिंदुस्थान सरकार दुप्पट श्रेय संपादन करील अशी आह्मी आशा बाळगतों.

---

## निझाम ग्यारेंटीड स्टेट रेलवे कंपनी लिमिटेड.

ह्या कंपनीचें प्रासिद्धिपत्रक आह्माकडेस आलें आहे. व त्या सोबत नवीन होणाऱ्या रेल्वेचा नकाशा व मि. अबदुल हक्क सि. आय इ. यांस स्टेट सेक्रेटरीकडून आलेल्या पत्राच्या प्रतीही आह्माकडेस आल्या आहेत. ह्या कंपनीचे हेतु व स्टेट सेक्रेटरीच्या संमतानें निझाम सरकार व ही कंपनी यां मधील झालेल्या कराराच्या शर्ती आह्मी वाचकांस सवडीनुसार कळवूं.

ह्या कंपनीचे आफिस इंग्लंडांत आहे. तिचे डायरेक्टरांची संख्या आठ आहे व त्यांत पूर्वीचे हैदराबादचे रेसिडेंट सर रिचर्ड मीड व निझाम रेलवे खात्याचे सेक्रेटरी अबदुल हक्क सरदार दिलरजंग बहादूर सी. आय. इ. हे दोघे आहेत. बाकीच्या पैकीं दोघे जण हिंदुस्थानांतील माजी अधिकारी आहेत व बाकीचे इतर कंपन्यांचे डायरेक्टर आहेत. ह्या कंपनीचें भांडवल एकंदर वीस लक्ष पौंड असून त्याचे एक लक्ष हिस्से आहेत. त्या पैकीं पांच लक्ष पौंड अगर पंचवीसहजार हिस्से निझामसरकारांशीं झालेल्या करारा प्रमाणें त्यांचेच राज्यांत भरण्यास त्यांजकरितां राखून ठेऊन बाकीच्या ह्मणजे पंधरा लक्ष पौंडाचे पाऊण लक्ष हिस्से भरणें कंपनीनें आपणा कडेस ठेविलें आहे. एक एक हिस्सा वीस पौंडाचा आहे. व हे जमा करण्या करितां यादी ता० ३ पासून ता० ८ जानेवारी पावेतों फिरणार होत्या. ह्या हिश्या बद्दल दरसाल दरशेकडा पांच पौंड प्रमाणें व्याज दर सहमाही लंडन येथें कंपनीस मिळणार व या बद्दल वीस वर्षे पावेतों निझाम सरकारांनीं हमी भरली आहे. वाडीपासून हैदराबाद व सिकंदराबाद पावेतों सध्याची चालू असलेली हिंदुस्थान सरकारचे ताब्यांतील निझाम स्टेट रेलवे ही कंपनी आपल्या ताब्यांत घेऊन दुसरे दोन फांटे एक हैदराबाद पासून निझाम सरकारचे राज्याच्या दक्षिण सरहद्दीवरील बिजवाडा पावेतों व दुसरा वरंगूळ पासून उत्तरेकडील सरहद्दीपर्यंत ह्मणजे चांदा पावेतों नवीन तयार करणार. ह्या कंपनीच्या व्याजाच्या रकमेची फेड करण्यास सव्वासहा लक्ष पौंड निराळे काढून ठेविले आहेत. हे फांटे तयार झाल्यावर व्यापाराच्या सोयी अधिक वाढून देशामधील दळणवळण अधिक सुलभ होईल.

---

मे. रेसिडेंट साहेब यांची स्वारी ता० १८ रोजीं सायंकाळीं हैदराबादेस येऊन दाखल झाली. पावेतीं त्यांचा रितीप्रमाणें सन्मान झाला. रेसिडेंसींतील अधिकारी व हैदराबादचे सरदार त्यांस सामोरे गेले होते, ह्या प्रवासांत त्यांजवर एक विघ्न आलें होतें. पण सुदैवानें तें टळलें हें कळविण्यास आह्मास संतोष वाटतो. मि. कारडरी ज्या डब्यांत बसले होते त्याची कमान एकाएकी तुटली. हें एक बरें झालें कीं त्या वेळेस गाडी सपाट जमीनीवर होती नाहीं तर भयंकर परिणाम झाला असता. यामुळें वाटेंत त्यांस गैरसोयीं झाल्या व विलंबही बराच लागला. एकंदरींत ते सुरक्षित येऊन पोहचले ही ईश्वराची कृपाच झाली.

---


# The Berar Samachar.

MONDAY, January, 28, 1884


## THE SETTLEMENT OF THE ILBERT BILL.

All is well, that ends well,. Our noble Lord has at last succeeded in putting a stop to the ungenerous attempt of the worthy representative of the Benighted Presidency, when he tried to "fan the dying embers of race animosity" in the Viceregal Council.

Though the *compromise* effected on this most important question, is not satisfactory in all its respects, still the *controversy* that was kept on by the *Anglo* Indians, cannot fail to impress Lord *Ripon*, with the conviction, that the Indians are a more temperate, thoughtful, and law--abiding people, than their less fortunate brethren of the west, whose boast of culture and civilization, consists in their exhaustion of the vituperative resources of the language of their mother country, and which was carried on, to an extent almost unprecedented in the annals of the British administration of this country, and kept up with a ... perseverance, regardless of the o... nary rules of decency and shame.

In removing race distinction amongst Judges and Magistrates, the *Government* of Lord Ripon has created race disqualification among the whites and blacks, though His Lordship must have been convinced from the agitation of the *Anglo* Indians, that even among white sheep, there are also black sheep.

The many administrative difficulties, which the provisions of the *Bill* will present themselves, when they are actually put in motion, have been clearly and lucidly explained by the honorable Kristo Dos Paul, but Lord Ripon characterised them as simply imaginary, for the simple reason, that the extensive powers given to the local Govenments, will render all such fears, illusory and groundless.

It is impossible to understand how *Lord Ripon* can so soon be brought to make up his mind, to place such implicit confidence in the heads of local Governments, when they thought fit *to* treat *His* Lordship with elaborate Essays on the fallacies of the memorable *Resolution of the 18th of May* 1882, which if allowed unrefuted, would have become the prize Essays, the *Prize* in India being the curse of the millions, and the prize in England being the prospect of conservatives getting into power, in the next election.

Whatever may be Lord Ripon's conduct, in this particular subject, yet there is no doubt, that he is loved deeply, and sincerely by the Indian *Nation*, as one, whose motto is "peace progress, and prosperity."

We yet hope, that on another occasion *His* Lordship will see his way, to make all Her Majesty's subjects, equal in the eye of Law, as "the stability of the *British* administration in

... the adamantine rock

## CORDERY VS. THE STATESMAN

It is with deep and unfeigned regret we have noticed the savage attack of the Statesman on our Resident.

We were always under the impression that English Journalists, are as a rule men of exceptional characters and it is not till the Statesman got into the hands of its present Editor, that we begin to see the force of every rule having an exception, even amongst the English Editorial staff.

It is well known that Mr Cordery is universally liked by all who come in contact with him. He is one of the few *C. S.s* out in India who carries with him the enviable reputation of being a first class classical scholar and an able administrator. His affability and gentle disposition combined with that manliness, which is the true characteristic of gentlemanship, are qualities which cannot be too highly valued, in the position of one, who holds the highest and most responsible political office, which it is in the power of Her Majesty's Government to confer.

Unfortunately none of Her Majesty's servants, who had the good fortune to take up their abode in the Residency mansion, enjoyed a bed of roses, but we sincerely trust that the change of events, which will soon be inaugurated by the hand of our noble Viceroy will also bring a change of circumstances, calculated to improve the by no means satisfactory condition of ...rs at Hyderabad.

## THE NEW DIRECTOR OF PUBLIC INSTRUCTIONS.

We heartily congratulate Mr. Sriram Bhicaji Jatar *B. A.* on his well merited promotion to the Directorship

We have already, on a former occasion, laid before our readers, his strong claims, to the office which is now placed under his charge, and we will on the present occasion express our sincere wish, that he will be spared for many years to come, to enjoy the fruits of his 16 years of unremitting and incessant toil.

We are sure no one will rejoice at this appointment, more than our Rao Bahadoor Narayan Bhai, whose worthy Lieutenant Mr. Srirampant, had been, during the whole time he was in Berar

Rumour is again busy, as to the probable saccessor of Mr. Srirampunt and we are extremely glad to say, that every one point their finger, to Mr. Vishnupant Mahajani *M. A.* the present Head Master of the Amraoti High School. We cannot speak too highly of his abilities, both as a scholar and a teacher.

The magnificent results achieved by the Amraoti school, in the Bombay University Examinations, year after year speak volumes for his fitness to the vacant post, and it will be an act of bare justice done to him, by appointing him as an Educational Inspector of this Province.

## EPITOME OF NEWS

Professor MAX MULLER has contriubted an article in the *Pall Mall Gazette* on the life of the late Dayanand Sarasvati in which he thus thus speaks about the interpretation of the Vedas by Dayanand :—

"In fact, the very character which we in Europe most appreciate in the Vedas—namely, the historical would be scouted by the orthodox theologians of India, most of all by Dayanand Sarasvati. In his commentary on the Rig Veda, written in Sanskrit, he has often been very hard on me and my own interpretation of Veda hymns, though he had evidently formed his opinion of my treatment of the Veda from secondary sources only. He could not understand why I should care for the Veda at all, if *I* did not consider it as divinely revealed. While I valued most whatever indicated human sentiment in the Vedic hymns, whatever gave evidence of historical growth or reflected geographical surroundings, he was bent on hearing in it nothing but the voice of *Brahma.* To him not only was everything contained in the *Vedas* perfect truth, but he went a step further, and by the most incredible interpretations, succeeded in persuading himself and others, that everything worth knowing, even the most recent inventions of modern science, were alluded to in the *Vedas*. Steam engines, railways, and steamboats all were shown to have been known to the poets of the *Vedas* for *Veda*, he argued, means Divine knowledge, and how could anything have been hidden from that? Such views may seem strange to us, though after all, it is not so very long ago that on historical and critical interpretation of the Bible would have roused the same opposition in England as my own free and independent interpretation of the Rig-*Veda* has roused in the breast of Dayanananda Sarasvati."

The learned professor concludes his article with the following observation on the future of the present religious movement in India :—

"Whether Dayananda's sect will last is difficult to say. India is in a process of religious fermentation, and new cells are constantly thrown out, while old ones burst and disappear. For a time this kind of liberal orthodoxy started by Dayananda may last; but the mere contact with Western thought, and more particularly with Western scholarship, will eventually extinguish it. It is difficult with the Brahma Samaj, under Debendranath Tagore and Keshub Chunder Sen. They do not fear the West on the contrary, they welcome it and though that movement too may change its name and character, there is every prospect that it will in the end lead to a complete regeneration in the religious life of *India*

Professor Thomas Holloway, of Pill and Ointment renown, died in England on 26th ultimo in his 83rd year, and is said to have left a fortune of £1,000,000.

The natives of India residing in London have decided to draw up a congratulatory address to Mr. Gladstone on the occasion of his seventy-fourth birthday.

In order to do away with the anomaly of having two systems of savings' banks in the Mofusil,—one belonging to Government and the other to the Postal Department'—it has been proposed to amalgamate all the district Government Savings Banks with the Postal Savings Banks The proposed scheme is likely to be carried out in a few weeks.

The Viceroy has riceived a telegram from the Secretary of State informing him that the Queen-Empress has heard of the death of Babu Keshub Chunder Sen, and has graciously desired His Excellency to convey to Babu Karuna Chunder Sen, the eldest son of the deceased, an expression of the regret with which Her Majesty has received the news and of her condolence with his family in the loss it has sustained.

'An *Englishman*' evidently of 'Britanicus' type having neither reason nor rhyme dares to give the following impertinent advice to Lord Ripon, in a Calcutta paper :—

"Lord Ripon, as we all know, flung a text at the head of Mr. Thomas; it was '*Righteousness* exalteht a nation.' Very good. Out of the same book I fling a text at the head of Lord Ripon, and my text is—'*Be* not righteous overmuch. Why should'st thou destroy thyself, before thy time?"

A *Railway* Conference on the question of simplifying the goods traffic arrangements throughout India is to assemble in Calcutta about the 10th of February. The members of the Conference will consist of a President and Secretary nominated by the Government of India, a traffic official from each line of railway, and "one officer of Indian experience in commerce and products appointed by the Government of India" *The* agents of the various railway companies are to be asked to go to Calcutta to assist at the first few meetings

## वऱ्हाड

येथील डेपुटी कमिशनरचे आफिसांतील ६० रुपयांचे क्लार्क मि. शेख कासिम हे दोन वर्षांच्या रजेवर होते. या महिन्यांत त्यांची रजा संपणार होती पण त्यांनीं पुन्ह ... वर्षाची रजा मिळण्याबद्दल अर्ज केला सुचना केली असतां ही रजा संपते त्या दिवशीं कामावर रुजूं झाले नाहींत व रजा वाढविण्याचें योग्य कारण नव्हतें ह्मणून डे. क. साहेबांनीं त्यांनां कामावरून ... केलें, व नवीन जागा भरून टाकिल्या. ... रुपयाच्या जागेवर रा. रा. ... यांस, त्याच्यां ३५ च्या जागेवर ... लक्ष्मण माधव ... व त्यांच्या २५ जागेवर रा. रा. गोविंद हरी साठकर य कायमचे नेमिले असें समजतें.

इनाम दप्तराक्लार्क ४० रु. चे कार रा. रा. राघो श्रीधर यांची ३० वर्षे ... ज्यामुळें ते पेनशन घेणार करितां त्या कामाची माहिती करून घेण्यासाठीं रा. रा. लक्ष्मण माधव यांस हुकूम मिळाल्याचें कळतें.

पंडित सुरज नारायण रेसिडेन्ट साहेबांचे अस्सामी यांच्या घरीं गेल्या आठवड्यात अदमासें तीन हजार रुपयांचे दागदागिन्यांची चोरी झाली. चोर सांपडला व तो त्यांचा फार दिवसांचा नोकर होता असें कळून आलें. बहुतेक सर्व जिन्नस सांपडले व चौकशी अंतीं अपराध्यास दोन वर्षे सक्त मजूरीची शिक्षा झाली. या दोन वर्षां पैकीं तीन महिने अंधारी कोठडी असावी व कांहीं फटके मारावे अशी ... ठरविली असें समजतें ...

## यवतमाळ ...

डे.क. साहेब व पो. सु. यांच्या स्वाऱ्या आजरोजीं पुन्हा दौऱ्यावर गेल्या अ. क. साहेब दौऱ्यावरून महिना अखेरीस परत येतील.

मिस्तर हिल साहेब हेड क्लार्क यांची रजा पुरी झाल्याकारणानें ते आपल्या कामावर रुजू झाले. मार्चअखेर हे पनशन घेणार आहेत. यांची जागा मिस्तर उलियम शामरंट साहेब यांस मिळणार असें ह्मणतात. त्यापुढील नेमणूकी कशा काय होणार तें समजलें नाहीं. मि० हिल सा. यांचे रजेच्या मुदतींत मि० उलि० शामरंट हे. क्लार्कचे काम पहात होतें.

नवीन अटपाची एकदोन दिवसांत खास येणार अशी बातमी समजते.

येथील डि. रजिस्ट्रार यांचे आफिसांतील कारकून सदाशिव राव ... पांच रुपये बढती मिळून ... लीं व तहशिलींतील रजि... हीं बदली बऱ्याच बढतीवर झाल्याची वर्दंता आहे.

"कसबे अकोट मौजे खानापुर व ... ळापुर येथील रहाणारे लोकांस क... येत आहे कीं शहर अकोट या ... निसिपाल कमेटी लागूं करून सदर ... चे हद्दींत हद्दीचे नंबर व नंबराचे सर्व जमीन सामील करण्याची सूचना ... ली आहे करितां सदर्हू शहरांस कमेटी ... रण्या बद्दल व त्या कमेटीचे हद्दींत ... हद्दीचे व त्याचे आंतील नंबरची जमीन सामील करण्याबद्दल ज्या कोणाची हरकत असेल त्यांनीं सदर्हू हरकतीचे अर्ज आ... तारखेपासून ३ तीन आठवड्याचे आंत मेहेरबान डिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे अकोलें यांचे कचेरींत दाखल करावेत'

याशिवाय हद्दीचा तपशील आहे असें सरकारी बातमी वरून कळतें.

## वर्तमानसार.

इलबर्ट बिलावर झालेल्या फेर तपासणींत आपचे नुकसान आहे ह्मणून नेटिवांच्या मद्रास व कलकत्ता येथें मोठ्या मंगीं सभा झाल्या. मुंबईत कांहींच होऊं नये काय?

लाहोरास दिवस दिवस ... प्रभाव जास्तीच आहे. बेरार्‌हिर.

कलियुगांतील शृगाळ.

वृत्तधारा ता० ७ जानुवारी १८८४ इतवीचे पत्रांत खालील चमत्कारिक मजकूर लिहिला आहे तो आमचे प्रीय वाचकांकरितां या खालीं उतरून घेतों.

कोणी लाला उमरावसिंग या नांवचा एक मनुष्य दिली शहरांत राहत असून त्याचा एकुलता एक सुमारें दोन वर्षांचा मुलगा त्याचे पुरोहितापाशीं ठेविला होता. उपाध्ये ही आपल्या लहानशा यजमानास मोठ्या ममतेनें सांभाळी व खेळवीत असे. आपल्या लोकांच्या नित्य संप्रदायानुसार व उमरावसिंग धनिक असल्यामुळें बालकेणें फार असे. कांहीं कामाकरतां लालाजी साहेब परगांवी गेले होते व एके दिवशीं त्यांचा मुलगा पुरोहिताशीं खेळत असतां ब्राह्मणाचे मनांत द्रव्य लोभानें प्रवेश करून आपल्या यजमानास जिवें मारून यमुनेत टाकून द्यावा असा बेत करून त्याचा गळा दाबून त्यास मारलें आणि त्याचे अंगावरील भुषणें काढून यमुना तटाकावर आणलें. इतक्यांत लाला उमराव गांवाहून परतयेत होते व दुरून त्यांणीं आपल्या पुरोहितास यमुना तटाकीं पाहिलें तेव्हां आपल्या घरची विचारपूस करावी ह्मणून तो जवळ आला तों त्याच्या कपड्यांत कांहीं गुंडाळलेलें आहे असें पाहिल्यावरून ते काय ह्मणून त्यास विचारलें. बरोबर पुरोहित घाबरून ह्मणाला कीं द्रव्य लोभानें मी त्याचे अलंकार काढून घेऊन त्याचा खून केला व त्याचें हे प्रेत आहे. पुरोहिताचें हें भाषण ऐकून लाला साहेबांचे मनाची काय स्थिति झाली असेल ती सांगावयास नकोच; परंतु त्यानें मोठें मन करून प्रेतावर अलंकार घालून प्रेत आपले घरी नेवविलें व सर्पदंशानें मुलगा मृत झाल्या... बायकोस कळविलें. एकच आकांत झा... त्याचें इष्टमित्र स्मशानविधीची व्यवस्था ...लागलें इतक्यांत एक फकीर येऊन खावयास मागूं लागला. लालाजीनें प्रसंगाकडे पाहून क्षमा मागितली परंतु त्यानें हट्ट धरला. अखेरीस चार पैशांची शेरणी आणून त्यांस देवविली. त्याणें त्याचे दोन भाग करून एक लालाजीस खाण्यास सांगितला. लालजीनें ही वेळ नव्हे ह्मणून वगैरे पुष्कळ सांगितलें परंतु तो ऐकेना, तेव्हां त्या जवळ बसण्यास जवळच्या मंडळीनें सांगितलें. त्यावरून लाला साहेब एका भागावर बसले. हें पाहातांच फकिरानें समोरच पडलेल्या प्रेताकडें पाहून त्यास मिठाई खाण्याविषयीं हांक मारली, त्या सरसा तो मुलगा उठून जवळच्या पानावर बसला. हें अलौकिक प्रदर्शन पाहून लाला साहेबांनी त्याच्या पायांवर लोटांगण घातलें व काय द्यावें ह्मणून विचारलें. इतक्यांत तो शंकर रुपी फकीर उठून चालता होऊन नाहीसा झाला. हें सत्य असल्यास अपूर्व खरें!

वेंगुले.

मुंबई-टांकसाळ येथील टांकशाळेंत गेल्या आठवड्यांत ४७,३०,७०१ रुपयांची चांदी पूर्वीची होती. व ११८३६ रुपयांची नवी आली. या आठवड्यांत नाणें मुळींच पाडलें नाहीं.

पावतीच्या डुप्लिकेट व ट्रिप्लीकेट कापी व ( दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीवर ) सुद्धा तिकीट लाविलें पाहिजे ह्मणून आडव्होकेट जनरल यांनीं आपला अभिप्राय एका खटल्यांत विचारल्या वरून दिला आहे. यात्र द स्टांप आक्टांत कांहींच खुलासा केलेला नाहीं.

कोल्हापूरकर महाराज यांच्या स्मारक कृत्याबद्दल अहमद नगर येथें सुमारें ६,००० रुपयांचे आंकडे पडले व पुढेंही वर्गणी जमा करण्याचें काम चालू आहे.

तारायंत्र मार्फत मनी आर्डर पाठविण्याची सोय लवकरच होणार आहे, असें ऐकतों.

पंजाबांतील शेतकीची सुधारणा करण्याकरितां सरकारानीं २,००,००० रुपयांचे लोन मंजूर केलें. पैकीं १३,००० रुपये रावळपिंडी प्रांतांत खर्च होणार.

गेल्या गुरुवारीं कलकत्ता येथें प्रोफेसर मोनियर उइलियम यांनीं आक्सफर्ड येथील इंडियन इनस्टिटयूट संबंधानें संभाषण केलें.

आसामचे सरहद्दीवरील लुशे लोकांची हालचाल दिसत नाहीं तथापि सिल्हेट येथील लोकांची भीति अजून उडाली नाहीं.

अमीर अबदुल रहिमान जलालाबादेस येणार आहेत अशी पेशावरास अफवा उठली आहे.

एक हजार लढाऊ आलबेनियन लोक लष्करांत ठेवण्याकरितां इजिप्तचा एक कर्नल कान्स्टंटिनोपल येथें गेला आहे.

मद्रास इलाख्यांतील राजमहेंद्री येथें शनिवार तारीख ५ रोजीं एक ब्राह्मणाच्या मुलीचा पुनर्विवाह झाला वर २३ वर्षांचा असून तेथील एका शाळेंतील शिक्षक आहे. वधूचें वय बारा वर्षांचें आहे.

खारटोम येथील १८,००० रहिवाशी लोकांस तें शहर सोडून जाण्याविषयीं हुकूम झाल्याचें समजतें.

कंतान बंदर घेण्याचा फ्रेंचांचा इरादा आहे, अशी चिनी लोकांस भीति पडली आहे.

चीनसरकार मोठ्या हिमतीनें लढाईची तयारी करीत आहे.

आडमिरल कोरबेट ब्याकनिन्हर चाल करणार असें समजतें.

दरसाल दर शेंकडा साडेतीन टक्के प्रमाणें ५,००,००० पौंडाचे लोन औद व रोहिलखंड रेलवे करितां काढावयाचें आहे त्या साठीं कर्ज देऊं इच्छिणाऱ्या लोकांची टेंडरें ( अर्ज ) मागविलीं आहेत.

गेल्या नवंबर अखेर संपणाऱ्या आठ माहींत गुदस्त सालापेक्षां १३,६३,००० रुपये मिठाचें उत्पन्न जास्त झालें; फक्त नवंबर महिन्यांत ३१, ३८,००० मण मीठ खपलें व त्यावरील कराचें उत्पन्न ६०,९२,००० रुपये झालें. सु. प.

नामदार व्हाईसराय साहेबांच्या कौन्सिलांत मुंबईचा कोणी नेटिव्ह कौन्सिलर लवकरच बोलाविणार आहेत असें कळतें.

मृत्यु-लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें कीं, आमचे प्रसिद्ध गोळ्या व मलम करणारे प्रोफेसर हालोवे हे गेल्या महिन्याच्या २६ व्या तारखेस परलोकवासी झाले. या गृहस्थांचे नांव ऐकलें नसेल अशी मनुष्यें फक्त एखाद्या रानटी देशांत मात्र मिळतील त्यांचें वय दहावसान कालीं ८५ वर होतें. त्यांच्या गोळ्या व मलमाच्या जाहिरातीची प्रसिद्धी होण्याकरितां विलायतेशिवाय बाह्य देशांतील सुमारें ४,००० वर पत्रांस आश्रय आहे. त्यांच्या गोळ्यामलमाचा धंदा किती मोठा वाढला आहे त्याचें आपल्या लोकास कल्पनाही नाहीं. फक्त बाह्यदेशीय वर्तमान पत्रास दर पत्री सरासरी सालीना निदान तीस रुपये धरले तरी, जाहिरातीबद्दलच सुमारें सवालक्ष रु. रुची पडतात. त्यांनीं स्त्रियांच्या शिक्षणाकरितां विलायतेंत आपल्या गोळ्यामलमाच्या व्यापारांतून धर्मार्थ ह्मणून मोठ मोठ्या रकमा खर्चून दोन जंगी विद्यालय बांधून दिली आहेत. त्याचे उदारण आपल्या लोकांनीं अनुकरणीय आहे यांत संशय नाहीं.

इं० प्र०

ब्रह्मदेशचा राजकारणी कैदी मीनगलाट यानें आपणास मद्रास इलाख्यांत कानानोर येथें ठेवावें अशी इच्छा प्रदर्शित केल्यावरून सरकारानें त्याचे इच्छेस मान दिला असें मद्रास टाईम्सवरून कळतें.

भावलपुरच्या नबाबांस पुत्ररत्न झाले असून त्याचें नांव मुबारकखान असें ठेवण्यांत आलें आहे.

सरकारी अंमलदारांनीं लोकांपासून मानपत्रें घेऊं नयेत असा सरकारचा नियम असतां अनेक प्रसंगीं या नियमाचें उलंघन झालेलें सरकाराचे लक्षांत आल्यावरून त्यांनीं सदर्हू नियम इतःपर सख्तीनें अमलांत आणिला पाहिजे ह्मणून नुकतेंच ठ० ग्या० त प्रसिद्ध केलें आहे.

ने० ओ०

विचित्र डेप्युटेशन-प्रसिद्ध विक्टर ह्यूगो यांजकडे नुकतेंच एक विचित्र डेप्युटेशन आलें होतें. चार नार्मन लोक दोन सुंदर तरुण मुली बरोबर घेऊन वरील गृहस्थाकडे गेले. व त्यांस असें सांगितलें कीं ह्या दोन सुंदर मुली आपल्याकडे आणल्या आहेत. आमचा हेतु इतकाच आहे कीं आपण यांचा आपल्या पत्नीस्थानीं अंगिकार करावा ही विनंती आपण अमान्य करणार नाहीं अशी आशा आहे. आपणास एवढी तसदी देण्याचें कारण इतकेंच आहे कीं. आमच्या मंडळीच्या मनांत आपल्या सारख्या कविश्रेष्टाचे प्रजेचा आमच्या इकडील स्त्रियांमध्यें संभव व्हावा, यासाठीं मंडळींनी ही दोन रत्नें निवडून काढून आपले चरणीं अर्पण केलीं आहेत. ही वेडगळ विनंती ह्युगो साहेबांनीं या स्त्रियांचा लोभ न धरितां फारच सभ्यतेनें नाकारून डेप्युटेशन विमुख परत पाठविलें.

पु० वै०

# धी इंडियन पार्लमेंट.

हिंदुस्थानांत निघणारें पहिलेंच पत्र, मराठी, इंग्रजी आणि गुजराथी भाषेंत.

ह्या पत्राचा मुद्दा—हिंदुस्थानांतील रयतेची खरीं सुखदुःखें सरकारच्या कानावर वारंवार पोंहचवून, त्या गोष्टीचा निकाल त्वरित लावून उभय पक्षकारानीं सुखानें रहावें हाच आहे.

या पत्रांतील विषय--कंट्राक्टरदारांस व इतर लोकांस सरकारी व गांवखाणच्या जाहिराती रयतेच्या उपयोगार्थ मुंबईतील व देशोदेशीच्या मुनिसिपालिट्या, कोर्टें, पोलिस खातें इत्यादि ठिकाणीं होणारे कायदे, त्यांतील फेरफार येत जातील व ते रास्त नसल्यास सदर्हू पार्लिमेंटचे योग्य व जगमान्य आक्षेप येऊन. शिवाय मुंबई वर्तमानसार, नागा, व एजंटाकडील खऱ्या बातम्या येत जातील. एकंदरीनें हें पत्र सरकारच्या उपयोगास व रयतेच्या सुखास झटण्याकरितां आठवड्यांतून दोन वेळ-.ह्मणजे इंदुप्रकाश एवढें मराठी, इंग्रजी आणि गुजराथी भाषेंत फेब्रूवारीचे १ ले तारखेपासून प्रसिद्ध होत जाईल.

हें पत्र श्रीमंतापासून तों गरिबांस घेण्यास सोईकर पडावें ह्मणून यांची किंमत थोडकीच ठेविली आहे.--मुंबईत ४ रुपये, बाहेरगांवीं ५ रुपये हिंदुस्थान बाहेर ६ रुपये टपालहंशील पडणार नाहीं ज्यांचा सदर्हू एक वर्षाचा पैसा जानेवारी ३१ पर्यंत येईल त्यांस हें पत्र पाठविलें जाईल (सन पुरतीं) नाटपेड पत्र व अपरा पैसा घेतला जाणार नाहीं.

—म्यानेजर.

धी इंडियन पार्लिमेंट.

पता—धोबितळ्या जवळ युनियन प्रेस मुंबई.

---

नोटीस.

नोटीस बेशमी रामकृष्ण भट बीन सोनभट वस्ती शेगांव यांस खालीं सही करणार नोटीस देतो असांजें तुह्मी मजला व सोन भटजी यास मौजे सवर्ण गउल खेडे व खडें या तीन गांवचें जोसपण एक वर्ष पर्यंत देऊन रक्षा बंधनापासून काम करण्यास लाविलें परंतु हल्लीं लग्न सराई जवळ आहे. व पुढें ज्यास्त उत्पन्न होऊन त्यातील हिस्सा द्यावा लागेल असें कपट मनात आणून मजला मार्गशीर्ष वद्य १५ पासून कामावरून दूर केलें तरी आज पर्यंत कष्ट करून ऐन उत्पन्नाचे वेळीं मजला रिकामें बसावें लागलें याजबद्दल माझे नुकसाना ऐवजी २५ रुपये व आज पर्यंत १०० रुपये उत्पन्न झाले त्यांपैकीं २५ रुपये माझा हीसा एकूण ५० रुपये देऊन आपसांत तंटा तोडावा हे बरें नाहींतर कायद्या प्रमाणें फिर्याद करून या नोटीसीचे खर्चा सुध्दा रुपये भरून घेऊ कळावें तारीख २० ज्यानेवारी सन१८८४ इसवी.

( सही ) गोविंद भट बीन संभा भट जोद दस्तुरखुद्द.

---

हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.